# जनसंपर्क विभाग

जळगाव दि.१ (प्रतिनिधी) : देशाच्या पंतप्रधानांनी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवाच्या कालावधीत दिलेल्या पंचप्रणाप्रती युवकांनी कटीबध्द व्हावे व भारताला जागतिक पातळीवर प्रथम स्थानावर नेण्यासाठी भरीव योगदान द्यावे असे आवाहन विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे यांनी राष्ट्रीय एकात्मता शिबिरात केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात आयोजित राष्ट्रीय एकत्मता शिबीरात आज शुक्रवार दि.१ डिसेंबर रोजी विद्यार्थ्यांशी राजेंद्र नन्नवरे यांनी संवाद साधला. यावेळी मंचावर पुणे येथील रा.से.यो. विभागीय संचालक अजय शिंदे, गुजराथ थेथील मुकेश रोही व रासेयो संचालक डॉ. सचिन नांद्रे उपस्थित होते. नन्नवरे पुढे म्हणाले की, स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवी वर्षाचा कार्यकाळ सुरु झाला असून सुवर्ण महोत्सवी वर्षापर्यंत असणार आहे. या काळात पंतप्रधानांनी दिलेल्या विकसित भारत, गुलामगिरीच्या मानसिकतेतून मुक्तता, भारतीय परंपरेचा गर्व, एकता व एकजूटता आणि नागरीक म्हणून कर्तव्याचे पालन हे पंचप्रण आहेत. या पंचप्रणांची यशस्वीरित्या अंमलबजावणी युवकांनी करुन देशाच्या सर्वांगीण विकासात भरीव योगदान द्यावे असे आवाहनही केले. यावेळी देशातील विविध ११ राज्यातील २१० विद्यार्थी व कार्यक्रम अधिकारी यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रासेयो स्वयंसेवक मोहित सरकार (नागपूर) याने तर आभार रा.से.यो. स्वयंसेवक प्रेरणा गोसालिया (पुणे) हिने मानले.

आज जागतिक एडस् दिनानिमित्त राष्ट्रीय एकात्मता शिबिरात सहभागी झालेल्या रा.से.यो. स्वयंसेवकांनी विद्यापीठात मानवी साखळी तयार केली. त्यानंतर पाहुण्यांच्या हस्ते हवेत फुगे सोडण्यात आले. तसेच या शिबिरार्थीनी प्लास्टीक मुक्त अभियान विद्यापीठ परिसरात राबवून स्वच्छता केली. सकाळी व्यवस्थापन परिषद सदस्य ॲड अमोल पाटील यांच्या हस्ते रा.से.यो. ध्वजाचे आरोहण करण्यात आले.

**बातमी नं. २**

जळगाव दि.१ (प्रतिनिधी): शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून पदवीस्तरावर नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचालक आणि प्राध्यापक यांनी सज्ज रहावे व पुढील तीन महिन्यांच्या कालावधीत सर्व शैक्षणिक घटकांपर्यंत या धोरणाबाबत जनजागृती करावी असे आवाहन कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांनी केले.

शुक्रवार दि. १ डिसेंबर रोजी विद्यापीठात व्यवस्थापन परिषद सदस्य, अधिसभा सदस्य, संस्थाचालक, प्राचार्य आणि नोडल ऑफिसर यांच्यासाठी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाबाबत एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेत प्रा. माहेश्वरी बोलत होते. पदवीस्तरावर राबविण्यात येणाऱ्या

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाबाबत पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन द्वारे प्रा. माहेश्वरी यांनी दिड तास माहिती दिली. हे धोरण राबवितांना संस्थाचालक आणि प्राचार्य यांना अधिक पुढाकार घ्यावा लागणार आहे त्यासाठी आपल्या परिसरातील उद्योग, संस्था, बँका, सहकारी संस्था आदींसोबत सामंजस्य करार करावे लागतील ज्यामुळे विद्यार्थ्यांना इंटर्नशिप मिळेल असे ते म्हणाले. नवीन शैक्षणिक धोरणानुसार पदवी अभ्यासक्रम चार वर्षांचा राहणार आहे. प्रवेश घेतल्यानंतर जरी विद्यार्थ्याने शिक्षण अर्धवट सोडले तरी प्रवेशाच्या वर्षापासून सात वर्षांच्या आत तो पुन्हा उर्वरित शिक्षण पूर्ण करू शकतो. चार वर्षाच्या या पदवी अभ्यासक्रमात एक वर्षानंतर विद्यार्थ्यांला पदवी प्रमाणपत्र, दोन वर्षानंतर पदविका, तीन वर्षा नंतर पदवी आणि चार वर्षानंतर पदवी ऑनर्स ही पदवी पाप्त होणार आहे. चार वर्षांनंतर पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या थेट द्वितीय वर्षाला अथवा पीएच.डी.ला विद्यार्थ्यांला पवेश मिळू शकतो. एका वर्षात विद्यार्थ्यांला ४० क्रेडीट पूर्ण करावयाचे आहेत. चार वर्षांचे १६०ते १७६ क्रेडीट राहणार आहेत. मेजर आणि मायनर विषय कसे राहतील याबद्दलची माहिती कुलगुरूंनी दिली. विद्यार्थी महाविद्यालयाकडे कसा आकर्षित होईल, तो वर्गात कसा टिकून राहील आणि त्याला प्राप्त पदवीच्या आधारावर रोजगार कसा मिळेल. हे मुद्दे महत्वाचे असल्याचे प्रा. माहेश्वरी यांनी सांगितले.

प्रारंभी प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे यांनी प्रास्ताविक केले. अधिष्ठाता प्राचार्य एस.एस. राजपूत व प्रा. अनिल डोंगरे यांनी विद्यापीठाने केलेल्या तयारीची माहिती दिली. उपस्थितांच्या शंकाचे निरसन यावेळी करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. सुनील पाटील यांनी केले. कुलसचिव डॉ.विनोद पाटील यांनी आभार मानले.

.......................................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: १ डिसेंबर, २०२३

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,
महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी